आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र -दुपारी १.३० वाजता

२३ सप्टेंबर २०२४ -सोमवार

**ठळक बातम्या**

- जगातल्या प्रत्येक क्षेत्रात विकासाकरता तंत्रज्ञानाची आवश्यकता असून तंत्रज्ञान विश्वव्यापी असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन / अमेरिकेत भारताचे आणखी दोन दूतावास सुरू करण्याची केली घोषणा

- जम्मू काश्मीर विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्याचा प्रचार आज संपणार, तिसऱ्या टप्प्यातल्या प्रचाराला जोर

- झारखंड विधानसभा निवडणुकीपूर्वीच्या आढाव्यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगाचं पथक राज्याच्या दौऱ्यावर

- श्रीलंकेचे राष्ट्रपती म्हणून अनुरा कुमारा दिस्सानायके यांचा शपथविधी

**आणि**

- २०२५मधे ऑस्करच्या शर्यतीत भारताचं प्रतिनिधित्व “लापता लेडीज” करणार

<><><><><>

जगातल्या प्रत्येक क्षेत्रात विकासाकरता तंत्रज्ञानाची आवश्यकता असून तंत्रज्ञान विश्वव्यापी असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे.

अमेरीका दौऱ्यात न्यूयार्कमध्ये अमेरीकेतल्या तंत्रज्ञान क्षेत्रामधल्या आघाडीच्या कंपन्यांच्या मुख्य व्यवस्थापकीय संचालकांची गोलमेज परिषद प्रधानमंत्री मोदी यांनी घेतली. तिथे ते बोलत होते. कृत्रिम बुद्धीमत्ता, जैवतंत्रज्ञान आणि सेमीकंडक्टर तंत्रज्ञान यावर या परिषदेने भर दिला. भारतासह जगभरात सगळीकडे नवनव्या तंत्रज्ञानाचा होत असलेला वापर आणि त्यातून सामान्यांना होणारा लाभ याबद्दल परिषदेत चर्चा झाली.तंत्रज्ञान आणि लोकशाही यांचं एकत्रीकरण म्हणजे मानवी

कल्याणाची हमी आहे, असं प्रधानमंत्री यावेळी म्हणाले. विविध क्षेत्रातील द्विपक्षीय सहभागाबद्दल मोदी यांनी यावेळी चर्चा केली.

अमेरिकेतला भारतीय समुदाय म्हणजे भारताचे सदिच्छा दूत असल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. न्यूयॉर्कमधील लाँग आयलंड इथं भारतीय समुदायातर्फे आयोजित कार्यक्रमात सांगितलं.

भारत आणि अमेरिकेतल्या द्विपक्षीय संबंधांमध्ये अनिवासी भारतीय समुदायानं बजावलेल्या भूमिकेचं त्यांनी कौतुक केलं. जगासाठी एआय म्हणजे आर्टिफिशिअल इंटेलेजिन्स म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता असा अर्थ आहे, पण आपण एआय म्हणजे अमेरिकन-इंडियन स्पिरिट म्हणजे अमेरिकी भारतीयांची वृत्ती असं मानतो असं ते म्हणाले. अमेरिकेतल्या भारतीयांनी अमेरिकेला भारतीयांशी जोडलं आहे आणि त्यांचं कौशल्य आणि बुद्धिमत्ता अतुलनीय आहेत, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

बोस्टन आणि लॉसएंजलिस इथं दोन भारतीय दूतावास सुरू केले जातील, अशी घोषणा प्रधानमंत्र्यांनी या वेळी केली. भारताचे सध्या न्यूयॉर्क, अटलांटा, शिकागो, ह्युस्टन, सॅन फ्रान्सिस्को आणि सिएॅटल इथं दूतावास आहेत. ह्युस्टन विद्यापीठात थिरुवल्लूर तमीळ भाषा अध्यासन सुरू करत असल्याचीही घोषणा केली.

भारतात जगभरातील भाषा, धर्म आणि पंथांचे लोक राहतात, पण तरीही देशात एकात्मता नांदते, असं मोदी म्हणाले. भारतीय संस्कृतीमध्येच वैविध्य समजून घेणं, ते जगणं आणि त्याचा दैनंदिन आयुष्यात समावेश करणं या गोष्टी समाविष्ट असल्याचं निरीक्षण त्यांनी मांडलं.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज न्यूयॉर्कमध्ये भारतीय प्रमाणवेळेनुसार पहाटे कुवेतचे राजपुत्र शेख सबाह अल-खालिद अल-सबाह यांच्याशी द्विपक्षीय चर्चा केली. दोन्ही देशांमधले संबंध आणखी दृढ करण्याबाबत दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाली. मोदी यांनी

नेपाळचे पंतप्रधान के. पी. शर्मा ओली यांच्याशीही भारत-नेपाळ भागिदारी वाढवण्याबाबत चर्चा केली. सीईओ राऊंडटेबल या कार्यक्रमात त्यांनी उद्योजकांशी चर्चा केली. होल्टेक इंटरनॅशनलचे डॉ. कृष्णा सिंह यांच्याशीही संवाद साधला आणि आण्विक ऊर्जा क्षेत्रात सहकार्य वाढवण्याबाबत चर्चा केली.

<><><><>

जम्मू काश्मीरच्या विधानसभा निवडणुकांच्या दुसऱ्या टप्प्याचा प्रचार आज संध्याकाळी संपणार आहे. दुसऱ्या टप्प्यात रियासी, राजौरी, पूंछ, श्रीनगर आणि बडगाम या पाच जिल्ह्यांमधल्या २६ मतदारसंघांसाठी येत्या बुधवारी२५ सप्टेंबर रोजी मतदान होईल. येत्या ८ ऑक्टोबर रोजी मतमोजणी होईल. दरम्यान, सर्व राजकीय पक्षांनी तिसऱ्या टप्प्यासाठीही प्रचाराचा जोर वाढवला आहे. लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी आज पूंछ आणि श्रीनगरमध्ये प्रचारसभांना संबोधित करत आहेत. नॅशनल कॉन्फरन्स - काँग्रेस पक्षाच्या युतीचे उमेदवार शहानवाज चौधरी आणि जम्मू-काश्मीर प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्ष तारिक हमीद कारा यांच्या समर्थनार्थ ते आज निवडणूक रॅली काढत आहेत. दरम्यान, हरयाणा विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज हरयाणाच्या तोहाना इथं प्रचारसभेला संबोधित करत आहेत.

<><><><>

आगामी विधानसभा निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांच्या नेतृत्वाखाली केंद्रीय निवडणूक आयोगाचं पथक दोन दिवसांच्या झारखंड दौऱ्यावर गेलं आहे. या पथकात निवडणूक आयुक्त ग्यानेश कुमार आणि सुखबीर सिंग संधू यांचा समावेश आहे. निवडणूक आयोगाचं पथक विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसोबत रांची इथं बैठक घेत आहे. भाजपा, काँग्रेस आणि माकप या राष्ट्रीय पक्षांसह झारखंड मुक्ती मोर्चा, राजद आणि आजसू हे प्रादेशिक पक्ष

आपली मतं निवडणूक आयोगापुढे मांडत आहेत. यानंतर निवडणूक आयोगाचं पथक अंमलबजावणी संस्थेच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेणार आहे. त्यानंतर आयोगाचं पथक राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त, पोलीस नोडल अधिकारी आदींशी चर्चा करतील.

निवडणूक आयोगाचं पथक २६ ते २८ सप्टेंबर या दरम्यान महाराष्ट्र दौऱ्यावर येणार आहे. या काळात राज्यातले विविध राजकीय पक्ष, राज्य निवडणूक आयोग,सुरक्षा यंत्रणा आणि प्रशासकीय अधिकारी यांच्यासोबत आयोगाचं पथक बैठक घेणार आहे. २८ सप्टेंबरला मुंबईत आयोगाची वार्ताहर परिषद होईल. यात राज्यातल्या निवडणूक कार्यक्रमाची घोषणा होण्याची शक्यता आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रात मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची त्यांच्या वर्षा निवासस्थानी जाऊन सदिच्छा भेट घेतली. दोन्ही नेत्यांमध्ये राज्यातल्या विविध प्रश्नांवर जवळपास ३० मिनिटं चर्चा झाली. विधानसभा निवडणुकीपूर्वी दोन्ही नेत्यांमध्ये झालेली ही बैठक महत्त्वाची मानली जात आहे. या बैठकीत विधानसभा निवडणूक विशेषत: मुंबईतल्या काही मतदारसंघांच्या संदर्भात चर्चा झाली असल्याची माहीती आहे.

**<><><><><>**

श्रीलंकेत नॅशनल पीपल्स पॉवर आघाडीचे अनुरा कुमारा दिस्सानायके यांनी आज सकाळी श्रीलंकेचे नववे राष्ट्रपती म्हणून शपथ घेतली. राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत दिस्सानायके यांनी सजिथा प्रेमदासा यांचा पराभव केला.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी श्रीलंकेच्या राष्ट्रपतीपदी निवड झाल्याबद्दल दिस्सानायके यांचं अभिनंदन केलं आहे. आपण एकत्र काम करुन दोन्ही देशांमधले

संबध दृढ करु. दोन्ही देशांमधली जनता आणि आसपासच्या क्षेत्राच्या भल्यासाठी काम करु असं मोदी यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

<><><><><>

माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव आज एका दिवसाच्या मुंबई दौऱ्यावर आले आहेत. केंद्रीय चित्रपट प्रमाणीकरण मंडळ आणि राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळाच्या कामकाजाचा आढावा ते आज घेत आहेत. तत्पूर्वी आज सकाळी जे. पी. मॉर्गन भारतीय गुंतवणूकदार परिषदेत ते सहभागी झाले होते.

<><><><><>

पुढच्या वर्षी म्हणजेच २०२५ मधे होणाऱ्या अकादमी पुरस्कार सोहळ्यासाठी भारताकडून लापता लेडीज हा चित्रपट पाठवण्यात येणार आहे.

किरण राव दिग्दर्शित हा चित्रपट बेस्ट फॉरेन फिल्म विभागात भारताचं प्रतिनिधित्व करेल, असं भारतीय चित्रपट महामंडळानं प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटलं आहे.

<><><><><>

एका तासात पाच लाख रोपं लावण्याचा जागतिक विक्रम नोंदवल्याबद्दल केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव यांनी आज १२८ इन्फंट्री बटालियन आणि पर्यावरणीय कृती दलाचं अभिनंदन केलं. राजस्थानच्या जैसलमेर इथे राबवलेल्या विशेष वृक्षारोपण मोहिमेत सैन्याने काल सुमारे ५ लाख २० हजार रोपं लावल्याची माहिती यादव यांनी त्यांच्या समाज माध्यमावरच्या संदेशात दिली.

<><><><><>

शेअरबाजारामधल्या व्यवहारांची सुरवातच आज तेजीनं झाली. शेअर बाजारांच्या संवेदी सूचकांकांनी सकाळीच आतापर्यंतचा सर्वोच्च स्तर गाठला. शेअर बाजारातले

व्यवहार सुरु होताना मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्सने ८४ हजार ६५१ चा तर राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीने २५ हजार ८७३ चा आकडा गाठला.

<><><><>

केदारनाथ, बद्रिनाथ आणि इतर तीर्थक्षेत्रांसाठी भारतीय रेल्वे भारत गौरव रेल्वे गाडी सुरू करणार आहे. आयआरसीटीसी आणि उत्तराखंड राज्य पर्यटन महामंडळामार्फत हा उपक्रम राबवण्यात येणार आहे. ही अकरा दिवसांची यात्रा असून, त्यात ऋषिकेश, रुद्रप्रयाग, केदारनाथ, कार्तिक स्वामी मंदिर, ज्योतिर्मठ आणि बद्रिनाथ या तीर्थक्षेत्रांचा समावेश असेल. मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज स्थानकातून तीन ऑक्टोबरला दुपारी दोन वाजता ही यात्रा सुरू होईल आणि त्याच स्थानकावर १३ ऑक्टोबरला दुपारी दोन वाजता परत येईल. प्रवाशांना कल्याण, पुणे, दौंड, मनमाड, खांडवा, इटारसी, भोपाळ, ग्वाल्हेर, हजरत निजामुद्दिन आणि हरिद्वार इथून यात्रेत सहभागी होता येईल.

<><><><>

हंगेरीत बुडापेस्ट इथं ४५ व्या बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये ऐतिहासिक दुहेरी सुवर्णपदकं जिंकणाऱ्या भारतीय संघाचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अभिनंदन केलं आहे. देशाच्या क्रीडाक्षेत्रातल्या पराक्रमाचा हा नवा अध्याय असून हे यश इतर बुद्धिबळ पटूंना प्रेरणा देईल, असं प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावरच्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

//<><><><><>//